# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.11.2025** **वार:शनिवार**

1. जी वीस शिखर परिषदेसाठी पंतप्रधान मोदी दक्षिण आफ्रिकेत दाखल
2. देशभरात कामगारांसाठीच्या चार नवीन कायद्यांच्या अंमलबजावणीला सुरुवात
3. नागपूरमध्ये संत्र्यासाठी स्वच्छ रोप केंद्र सुरू करण्याची केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची घोषणा आणि
4. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दुसरा कसोटी क्रिकेट सामना आजपासून गुवाहाटीमध्ये

**G20**

पंतप्रधान नरेंद्र मोदी जी वीस नेत्यांच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग इथं काल पोहोचले. यावेळी विमान तळावर त्यांचं पारंपरिक पद्धतीनं उत्साहात स्वागत करण्यात आलं. 'ऐक्य, समानता, शाश्वतता' ही या वर्षीच्या जी वीस परिषदेची संकल्पना आहे.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांची भेट घेतली. संरक्षण, महत्त्वाची खनिजे, व्यापार आणि गुंतवणूक, शिक्षण यासह विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर दोन्ही नेत्यांनी या भेटीत चर्चा केली.

पंतप्रधानांनी दक्षिण आफ्रिकेतील बहुराष्ट्रीय इंटरनेट आणि तंत्रज्ञान कंपनी, नॅस्पर्सचे अध्यक्ष कूस बेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी फॅब्रिसियो ब्लोईसी यांच्यासोबतही बैठक घेऊन स्टार्टअप आणि अवकाश क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासह विविध विषयांवर चर्चा केली.

नॅस्पर्सच्या भारतातील यशामुळं देशातील व्यवसाय सुलभता आणि स्टार्टअप परिसंस्थेची ताकद दिसून येत असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**श्रमसंहिता**

कामगारांसाठीचे 4 नवीन कायदे कालपासून देशभरात लागू झाल्याची घोषणा केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी केली. वेतन संहिता 2019, औद्योगिक संबंध संहिता 2020, सामाजिक सुरक्षा संहिता 2020, आणि व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य आणि कामाच्या परिस्थिती विषयक संहिता 2020 या नवीन कायद्यांमुळं कामगारांच्या हिताचं रक्षण होईल; देशातील प्रत्येक कामगाराला प्रतिष्ठेनं जीवन जगता येईल असं मांडवीय यांनी म्हटलं आहे. जुन्या कायद्यांमधल्या तरतुदी कालबाह्य झाल्या असून नवीन कायद्यांमुळं कामगारांना चांगलं वेतन, विमा सुरक्षा आणि इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळेल, असं मनसुख मांडवीय म्हणाले. या कायद्यांच्या अंमलबजावणीमुळं वेळेवर किमान वेतन, नियुक्तीपत्र, महिलांना समान वेतन, 40 कोटी कामगारांना विमा संरक्षण, तसंच निश्चित कालावधीसाठी कामावर ठेवलेल्यांना वर्षभरानंतर ग्रॅच्युईटीचा लाभ मिळेल. 40 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांना वार्षिक आरोग्य तपासण्या मोफत करता येतील. निर्धारित वेळेपेक्षा जास्त वेळ केलेल्या कामासाठी दुप्पट वेतन तसंच धोकादायक परिस्थितीत काम करणाऱ्या कामगारांना आरोग्य विमा मिळण्याची तरतूद या कायद्यांमध्ये आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'श्रमेव जयते' म्हणत याचं स्वागत केलं असून, या संहिता स्वातंत्र्यानंतरच्या सर्वात जास्त सर्वसमावेशक आणि प्रगतिशील सुधारणा असल्याचं म्हटलं आहे.

**शासन निर्णय**

राज्यात उभारल्या जाणाऱ्या कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या रुग्णालयांसाठी सरकारी जमीन 'महसूल मुक्त' आणि 'सारा माफी'ने मोफत दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून महसूल विभागानं याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे.

**ॲग्रोव्हिजन**

ॲग्रो व्हिजन हा ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा त्रिवेणी संगम असून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठीचा उत्तम मंच असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी म्हटलं आहे. नागपूरमध्ये सोळाव्या ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन करताना ते बोलत होते. नागपूरमधील संत्रा उत्पादकांसाठी स्वच्छ रोप केंद्र सुरु करण्याची घोषणा त्यांनी केली....

**ओरेंज में और उत्पादकता बढ़े इसलिए जरुरी है क्लीन प्लांट हमको अच्छे पौधे चाहिए नितिन जी ने बिल्कुल सही कहा और नितिन जी अच्छे पौधे के लिए अब हमने फैसला किया है क्लीन प्लांट सेंटर नागपुर में प्रारंभ किया जाएगा ओरेंज का संतरे का और उसमें लगभग सत्तर करोड़ रुपए हम खर्च करेंगे। किसान को अच्छे पौधे मिल जाए।**

उद्घाटन सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. विदर्भात संत्र उत्पादन पाच वर्षांत दुप्पट होईल, असा विश्वास गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले.....

**तो टेक्नोलॉजी का उपयोग करके उत्पादन खर्चे को कम करना और उत्पादन को प्रोसेसिंग करके बीज के मीडिएटर हटा कर डायरेक्ट मार्केट में अगर बेचेगा तो किसान को अच्छा उत्पादन मिल सकता है। अभी भरणे साहब मुझे और शिवराज जी को बता रहे थे कि उनके क्षेत्र में डालिंब होता है। बीस लाख रुपये एकर किसानों को प्रॉफिट मिला है तो कहीं ना कहीं हमें एक्सपेंडिचर उत्पादन खर्चे को कम करना, फालतू रासायनिक फर्टिलाइजर, इंसेक्टिसाइड खर्चा करने की जरूरत नहीं है तो नहीं करना और उत्पादन क्षमता बढ़ाकर खर्चे को कम करके प्रॉफिट ओएफ मार्जिन को बढ़ाना।**

**हुतात्मा स्मृतिदिन**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठीच्या लढ्यात प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना काल हुतात्मा स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आलं. मुंबईत हुतात्मा चौक इथल्या स्मृतिस्थळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केलं. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगल प्रभात लोढा आणि विविध पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**श्रमदान-सिंधुदुर्ग**

कोणताही शासकीय निधी उपलब्ध नसताना सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ पंचायत समितीच्या पुढाकारातून लोकसहभाग आणि श्रमदानातून  वनराई आणि  कच्चे बंधारे बांधकामाच्या सप्ताहाला काल सुरुवात झाली. ऐकुया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून....

**21 नोव्हेंबर ते 27 नोव्हेंबर पर्यंत हा बंधारा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. याची सुरुवात शुक्रवारी अणाव गावातून करण्यात आली. या बंधारा सप्ताहामध्ये कुडाळ तालुक्यात एक हजार पेक्षा जास्त बंधारे बांधण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. त्याप्रमाणे प्रत्येक ग्राम पंचायतीला लक्ष्यांक ठरवून देण्यात आला आहे. कुडाळ पंचायत समिती, ग्राम पंचायत अधिकारी संघटना, ग्राम पंचायत अणाव आणि सरपंच संघ यांच्या वतीने हा बंधारा सप्ताह लोकसहभागातून साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमात ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, हायस्कूल, युवक क्रीडा मंडळ, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, कर्मचारी संघटना सहभागी झाल्या आहेत.**

**कुडाळचे गट विकास अधिकारी प्रफुल्ल वालावलकर यांच्या पुढाकाराने संपूर्ण तालुक्यात ही मोहीम राबविली जाणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.**

**इफ्फी**

पणजी इथं सुरू असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव म्हणजे इफ्फीमध्ये काल विविध देशांमधील राजदूतांची परिषद झाली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल. मुरुगन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत आंतरराष्ट्रीय चित्रपट सहनिर्मितीला चालना देणं, जागतिक चित्रपट महोत्सवांमध्ये भारतीय चित्रपटांना स्थान देणं आणि चित्रपटांची चोरी अर्थात पायरसी रोखण्यासाठी काय उपाय करता येतील यावर चर्चा झाली. चित्रपट निर्मिती क्षेत्राला बळकट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याचं आवाहन माहिती आणि प्रसारण सचिव मंत्री संजय जाजू यांनी केलं.
मास्टरक्लासेसचं उद्घाटनही काल झालं. यात चर्चा, कार्यशाळा, गोलमेज संवाद, मुलाखत सत्रं, संभाषणात्मक कार्यशाळा असे विविध कार्यक्रम असणार आहेत. दादासाहेब फाळके चित्रनगरीतर्फे श्री गणेशा आणि मुक्काम पोस्ट देवाचं घर या दोन चित्रपटांचं प्रदर्शन काल झालं.

**अर्जमाघारी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा काल शेवटचा दिवस होता.

पुणे जिल्ह्यात नगराध्यक्षपदांसाठीच्या 17 जागांसाठी 119 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर सदस्य पदासाठी 1585 जण निवडणूक लढवत आहेत.

लातूर जिल्ह्यातील 4 नगर परिषदा आणि एका नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदासाठी 44; तर सदस्य पदासाठी 614 जण निवडणुकीच्या आखाड्यात आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरलेल्या आणि छाननीनंतर वैध ठरलेल्या 91 उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यात नगराध्यक्षपदांच्या सात, तर नगरसेवकपदांच्या 84 उमेदवारांचा समावेश आहे.

धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा नगर परिषदेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच नगराध्यक्षांसह सर्वच्या सर्व 26 नगरसेवकांची बिनविरोध निवड झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना आजपासून गुवाहाटी इथं होणार आहे. सकाळी 9 वाजता सामना सुरू होईल. कोलकता इथं झालेल्या पहिल्या सामन्यात कर्णधार शुभमन गिलला दुखापत झाल्यामुळे आजच्या सामन्यात कर्णधारपदाची जबाबदारी ऋषभ पंतवर सोपावली आहे. मालिकेतला पहिला सामना दक्षिण अफ्रिकेनं जिंकला आहे.

**हवामान**

राज्याच्या काही भागात थंडीचा जोर कायम असतानाच कोकण आणि मध्य महाराष्ट्रात येत्या दोन दिवसात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार